ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख १७ ऑक्टोबर, १९५६ | अंक ४२

## विविध माहिती

**मासे नेण्यासाठी खास डबे**—मासे गोठविलेल्या स्थितींत नेण्यासाठी भारतीय सरकार रेल्वेच्या चार खास डब्यांची सोय करणार आहे. त्यांपैकी दोन रुंद रुळांवर धावणारे व दोन अरुंद रुळांवर धावणारे असतील. डबे अमेरिकेहून मागविण्यांत येणार आहेत. भारत-अमेरिका तांत्रिक साह्याच्या करारास अनुसरून ह्याविषयीं बोलणीं करण्यांत येत आहेत.

**ग्रंथांचें जंगी प्रदर्शन**—साहित्य ॲकॅडमीतर्फे पुढील महिन्यांत दिल्ली येथें पुस्तकांचें एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत भारतामधील १४ प्रमुख भाषांतील पुस्तकें ठेवण्यांत येतील. आधुनिक शिक्षणासाठीं लागणारें विविध प्रकारचें साहित्य भारतीय भाषांतून कितपत उपलब्ध आहे तें दाखविण्याचा प्रदर्शनाचा हेतु आहे.

**ग्रामोद्योगाला उत्तेजन**—बिहारच्या सरकारनें आपल्याला लागणाऱ्या अनेक वस्तू शक्य तर ग्रामोद्योगाच्या बनावटीच्या घेण्याचें ठरविलें आहे. ग्रामोद्योगाच्या वस्तूंना उत्तेजन देण्यासाठी हें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. ग्रामोद्योगांना सरकारी नोंदींत आपला अंतर्भाव करून घेतां यावा म्हणून अर्ज करण्याची मुदत ऑक्टोबर अखेर वाढविण्यांत आली आहे.

**घरबांधणीसाठीं कर्जें**—कमी उत्पन्न असलेल्या लोकांना घरें बांधण्यास मदत करण्यासाठी भारतीय सरकारनें १९५६ सालीं तीन राज्य-सरकारांना मिळून ७६·७३ लाख रुपयांचीं कर्जें दिलीं. राजस्थान सरकारला २१·४ लाख, उत्तर प्रदेश सरकारला ५५·२६ लाख, आणि आसाम सरकारला ८०,००० रुपये कर्जाऊ देण्यांत आले.

**जर्मन सरकारची शस्त्रास्त्रांची खरेदी**—पश्चिम जर्मनीच्या पार्लमेंटनें जर्मन सरकारला परराष्ट्रांकडून शस्त्रास्त्रांची खरेदी करण्याची परवानगी दिली आहे. बहुतेक शस्त्रास्त्रांची खरेदी अमेरिकेकडून करण्यांत येईल. सरकारनें २,००० अमेरिकन रणगाडे आणि १,५०० चिलखती गाड्या घेण्याचें ठरविलें आहे. ह्याशिवाय इतरहि कांहीं आधुनिक अमेरिकन शस्त्रास्त्रें खरेदी करण्यांत येणार आहेत.

**१०,००० रुपये किंमतीचा दरवाजा**—कर्नाटकाच्या विधान सभेसाठी जी नवीन इमारत बांधण्यांत येत आहे, तिला एक चंदनी दरवाजा बसविण्यांत येणार असल्याची बातमी आहे. नक्षीकाम केलेल्या ह्या दरवाजाला १०,००० रुपये खर्च येणार आहे. लोकांना काटकसर करण्यास सांगणारें सरकार स्वतः मात्र पैशाची उधळपट्टी करीत आहे, अशी टीका ह्यासंबंधीं करण्यांत येत आहे.

**गुलमर्ग येथील वेधशाळा**—अणु अगर हैड्रोजन बॉम्बचा स्फोट करण्यांत आल्यास हवेंतील किरणोत्सर्गाची नोंद करण्याची व्यवस्था गुलमर्ग येथील वेधशाळेंत आहे. ह्याच वेधशाळेंत विश्व-किरणांसंबंधीं संशोधनहि करण्यांत येतें. वेधशाळा अधिक कार्यक्षम करण्यासाठी भारतीय सरकारनें काश्मीर सरकारला ६,००० डॉलर्सची मदत देण्याचें ठरविलें आहे.

**रेशमाच्या गिरणीचें राष्ट्रीयीकरण**—म्हैसूरच्या सरकारनें म्हैसूर सिल्क फिलेचर्स ही एका लिमिटेड कंपनीच्या मालकीची गिरणी चालविण्यासाठी आपल्या ताब्यांत घेतली आहे. गिरणीला वारंवार कर्जें देऊनहि ती तोट्यांत चालली होती. गिरणींत २,५०० मजूर काम करतात व दरसाल १,५०,००० पौंड रेशमाचें उत्पादन करण्यांत येतें.

**सुखद हवामानाची आगगाडी**—दिल्ली ते हौरा ह्या स्टेशनांच्या दरम्यान २ ऑक्टोबरपासून तिसऱ्या वर्गाची एक गाडी सुरू करण्यांत आली आहे. ह्या गाडींतील डब्यांत हवा सुखद राखण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. तिसऱ्या वर्गाचें मेलचें तिकिट २५ रु. २ आणे आहे. ह्या गाडीनें जाणाऱ्यांना मात्र ४३ रु. १३ आणे आकार यावा लागेल.

**जागतिक बँकेचे बॉंडस**—जागतिक बँकेनें अमेरिकेच्या बाहेरील पैसे गुंतविण्याऱ्या लोकांना ७·५ कोटी डॉलर्स किंमतीचे दोन वर्षें मुदतीचे बॉंडस् विकत देण्याचें ठरविलें आहे. हे बॉंडस् २२ देशांतील लोक विकत घेत आहेत. दरसाल दर शेंकडा ३॥ टक्के असा व्याजाचा दर आहे. बॉंडसूची रुपयांतील किंमत सुमारें ३५·६ कोटी रुपये आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भारत व जर्मनी ह्यांच्यामधील व्यापारी करार

भारत आणि जर्मनी ह्यांच्या दरम्यान तीन वर्षे मुदतीचा व्यापारी करार करण्यांत आला आहे. उभयतां देशांच्या सरकारांनीं आपआपल्या आयात-निर्यात विषयक व परदेशीय चलनाबाबतच्या धोरणास अनुसरून परस्परांमधील व्यापार-विनिमय वाढविण्याचें ठरविलें आहे. भारतानें जर्मनीला तंबाखू, निरनिराळ्या प्रकारचीं खनिजें, कापड, कच्च्या व काथ्याच्या वस्तू, ग्रामोद्योगांत तयार झालेला माल, इत्यादींचा पुरवठा करण्याचें ठरलें आहे. उलटपक्षीं जर्मनी भारताला विविध प्रकारचीं यंत्रसामुग्री, रेल्वे एंजिनें, सिमेंट व साखर ह्यांच्या निर्मितीसाठी लागणारे संपूर्ण कारखाने, दुर्बिणीसारख्या वस्तूंना लागणाऱ्या कांचा, शास्त्रीय उपकरणें, बिनतारी संदेशवाहनाचें साहित्य, वृत्तपत्रांचा कागद, इत्यादि माल पुरविणार आहे. भारत व जर्मनी ह्यांच्यामधील व्यापार अलीकडे वाढत्या प्रमाणावर होऊं लागलेला आहे. १९५५ सालीं जर्मनीकडून भारताला निर्यात केलेल्या मालाची किंमत सुमारें १.५ कोटी रुपये झाली. ह्याच वर्षी भारतानें जर्मनीला ६५ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात केला. उभयतां देशांतील व्यापारी संबंधाबद्दल बोलतांना जर्मनीचे भारतामधील प्रतिनिधी मि. वाइस म्हणाले कीं भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उभारावयाच्या कारखान्यांपैकीं कांहीं कारखाने उभारण्याच्या कामीं सहकार्य करण्याची जर्मन सरकारची तयारी आहे. ह्या बाबतींतील तपशिलाची चर्चा उभय देशांच्या प्रतिनिधींनीं स्वतंत्रपणें करावी, असें सुचविण्यांत आलें. आहे. तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी भारतीय विद्यार्थी जर्मनींत आले तर त्यांचा कांहीं खर्च सोसण्याची आणि त्यांना जरूर त्या सवलती देण्याचाहि जर्मन सरकार विचार करील. ह्या बाबतींत अधिक वाटाघाटी होणें जरूर आहे.

### नव्या भांडवल उभारणीची छाननी

( १९४८ ते जून, १९५६; आंकडे कोटी रुपयांचे )

| उद्योगाचा गट | ऑर्डि. | प्रेफ. | डिबेंचर | एकूण |
|---|---|---|---|---|
| इंजिनिअरिंग, लोखंड व पोलाद | १०७ | ११.१ | ४.४ | २६.२ |
| वीज ... | १३.५ | १.१ | ६.० | २०.६ |
| कपास-कापड ... | ७.० | २.३ | ५.२ | १४.५ |
| सिमेंट ... | २.६ | ०.४ | — | ३.० |
| कागद ... | ४.४ | २.९ | १.३ | ८.६ |
| केमिकल्स ... | ४.४ | २.० | — | ६.४ |
| शिपिंग ... | ३.५ | ०.३ | ५.० | ८.८ |
| बँक ... | २.१ | — | — | २.१ |
| ताग ... | १.७ | — | १.३ | ३.० |
| साखर ... | ०.८ | ०.६ | ०.१ | १.५ |
| कोळसा ... | ०.९ | ०.७ | ०.८ | २.४ |
| मळे ... | २.० | — | ०.६ | २.६ |
| विमा ... | ०.४ | — | — | ०.४ |
| तेल ... | — | ०.८ | १४.० | १४.८ |
| व्यापार ... | २.३ | ०.८ | — | ३.१ |
| वहातुक ... | २.० | — | — | २.० |
| तंबाखू ... | १.२ | — | — | १.२ |
| इतर खर्च ... | ८.२ | ३.५ | १.७ | १३.४ |
| एकूण ... | ६७.७ | २६.५ | ४०.४ | १३४.६ |

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *मॅनेजर.*

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., *चेअरमन*


**माधवाश्रम लि.** भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**किर्लोस्कर**

**शेंगायंत्रें**




या यंत्राकडून दर तासाला ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जात असून तें चालविण्यास ६ ते ८ अश्वशक्ति लागते. याशिवाय लहान प्रमाणावर हातानें व पॉवरवर चालणारीं यंत्रें मिळतात.

"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र

सविस्तर माहितीसाठी लिहा.

**किर्लोस्कर ब्रदर्स, लि., किर्लोस्करवाडी**

# अर्थ

बुधवार, ता. १७ ऑक्टोबर, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेचा नफा

### तुटीच्या अर्थव्यवस्थेचा सुपरिणाम !

रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या जून, १९५६ अखेरच्या अहवालावरून दिसून येतें, कीं त्या वर्षीं रिझर्व्ह बँकेचें उत्पन्न खूपच वाढलें व नफ्यांतहि वाढ झाली. रिझर्व्ह बँकेला एकूण ४१·४५ कोटी रुपये उत्पन्न मिळालें व खर्च ५·४५ कोटी रुपये झाला. १९५४–५५ मध्यें फक्त २५·०१ कोटी रुपये उत्पन्न मिळालें होतें आणि खर्च ५·०१ कोटी रुपये झाला होता. अशा रीतीनें, पूर्वीच्या वर्षीं २० कोटी रुपये, तर १९५५–५६ मध्यें ३६ कोटी रुपये नफा उरला. तथापि, ही ३६ कोटी रुपयांची रक्कम नफा म्हणून दाखविलेली नाहीं. कारण, उत्पन्नांतून १५ कोटी रुपये नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट ( लाँगटर्म ऑपरेशन्स ) खातीं वर्ग करण्यांत आलें असून १ कोटी रुपये नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट ( स्टॅबिलायझेशन ) फंडाकडे वर्ग करण्यांत आले आहेत. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४६ अ आणि ४६ ब कलमान्वयें ह्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत. त्याकारणानें, निव्वळ नफा २० कोटी रुपयेच दिसत आहे. मध्यवर्ती सरकारला द्यावयाची नफ्याची रक्कम कायम ठेवून, बाकीचा नफा वरील दोन तरतुदींसाठीं राखून ठेवलेला आहे.

रिझर्व्ह बँकेचा नफा वाढण्याचीं मुख्य कारणें ( १ ) स्टर्लिंग ट्रेझरी बिलांवर ज्यास्त दरानें डिस्कौंटची प्राप्ति झाली, आणि ( २ ) मध्यवर्ती सरकारच्या रिझर्व्ह बँकेंतील शिलका कमी होऊं लागल्या त्या भरून काढण्यासाठीं निर्माण केलेल्या 'ॲडहॉक' ट्रेझरी बिलांवरील डिस्कौंटचें उत्पन्नहि जास्त झालें, असें अहवाल सांगतो. तुटीच्या अर्थव्यवस्थेमुळें चलन मिळविण्यासाठी ट्रेझरी बिलें निर्माण करण्यांत येतात, तीं डिस्कौंट करण्यांत उत्पन्न चांगलें मिळतें. म्हणजे, हें उत्पन्न व त्यांतून रहाणारा नफा हा कृत्रिम चलनाचाच परिणाम आहे. कृत्रिम चलनाचा पुरवठा आतां वाढत गेला, म्हणजे त्यासाठीं निर्माण केलेल्या ट्रेझरी बिलांवरील डिस्कौंटचें उत्पन्नहि वाढत जाईल, हें उघड आहे.

रिझर्व्ह बँकेची परदेशांतील गुंतवणूक मात्र कमी होत चालली आहे. सहाजीकच, विदेशी रोख्यांवर मिळणारें व्याजहि घट दाखवील. १९५६–५७ च्या पहिल्या सहामाहींत परदेशी हुंडणावळींत ९० कोटी रुपयांची प्रतिकूल तफावत पडली आहे. म्हणजे, हिंदी ट्रेझरी बिलांच्या डिस्कौंटमुळें उत्पन्न वाढलें, तरी विदेशी रोख्यांवरील व्याजाच्या घटीमुळें, पुढील १९५६–५७ मध्यें रिझर्व्ह बँकेला १९५५–५६ इतका नफा कदाचित् उरणार नाहीं; नफ्यांत वाढ तरी बहुधा होणार नाहीं, असा अंदाज आहे.

---

**दुर्बिणींना लागणाऱ्या कांचा**—भारतीय सरकार दुर्बिणीसारख्या वस्तूंना लागणाऱ्या व चष्म्यांना लागणाऱ्या कांचा तयार करण्याचा कारखाना कलकत्त्याजवळ काढणार आहे. कारखान्यांत पहिल्या प्रकारचीं ५० टन वजनाचीं भिंगें व दुसऱ्या प्रकारचीं २०० टन वजनाचीं भिंगें दरसाल तयार होतील.

## प्लॅस्टिकच्या मालाची निर्यात

प्लॅस्टिक एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे अध्यक्ष श्री. रामचंदानी ह्यांनीं आंध्र चेंबरपुढें भाषण करतांना प्लॅस्टिकच्या वस्तूंच्या परदेशीय बाजारपेठांकडे अधिक लक्ष देण्याचें महत्त्व प्रतिपादन केलें. भारतांत प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करणारे सुमारें १०० मोठे कारखाने आहेत. त्याशिवाय कांहीं छोटे कारखानेहि थोडेबहुत उत्पादन करतात. ह्या धंद्यांत १३,००० कामगार गुंतलेले असून भांडवलाची गुंतवणूक ८ कोटी रुपयांपर्यंत झालेली आहे. देशाच्या गरजा भागवून परदेशांतहि माल पाठवूं शकण्याइतकी उत्पादनक्षमता कारखान्यांजवळ आहे. पण ह्या मालाच्या अतिपूर्वेकडील बाजारपेठेंत भारतीय मालाला हाँगकाँगहून येणाऱ्या व जपानकडून येणाऱ्या मालाच्या तीव्र स्पर्धेला तोंड द्यावें लागतें. परदेशांत कोणत्या प्रकारच्या मालाला किती मागणी आहे ह्याचा अभ्यास करण्यांत आल्यास भारतीय मालाला स्पर्धेला तोंड देतां येईल, असें चेंबरतर्फे सुचविण्यांत आलें. उत्तरादाखल भाषण करतांना श्री. रामचंदानी म्हणाले कीं, अलीकडे भारतामधून मालाची निर्यात कमी झालेली आहे. हाँगकाँग व जपान येथील अशा कारखान्यांतून मजुरीचे दर स्वस्त आहेत आणि मजूरविषयक कायदेहि भारताच्या मानानें कमी कडक आहेत. त्यामुळें ह्या कारखान्यांना माल स्वस्ताईनें उत्पादन करतां येतो. भारतीय कारखान्यांनीं आपल्या उत्पादनाच्या तंत्रांत सुधारणा केली आणि उत्पादनाच्या खर्चांत काटकसर केली तर प्लॅस्टिकच्या मालाची निर्यात वाढवितां येणें शक्य आहे. कौन्सिल मध्यपूर्वेतील आणि अतिपूर्वेकडील देशांचा दौरा करणार आहे. प्लॅस्टिकच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठीं काय उपाय करावे ह्यासंबंधी दौऱ्यानंतर सूचना करतां येणें शक्य होईल.

---

## मद्रास राज्यांतील सहकारी संस्था

मद्रास राज्य सरकारच्या सहकारी खात्याचा ३० जून, १९५५ अखेर संपलेल्या वर्षाचा कारभार-विषयक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून राज्यांतील सहकारी चळवळीची परिस्थिति पुढीलप्रमाणें दिसून येते. मद्रास राज्यांतील सहकारी चळवळीची प्रगति यथाक्रम चालू आहे. अहवालाच्या वर्षीं सहकारी संस्थांच्या संख्येंत वाढ होऊन त्यांची संख्या १४,८८५ वरून १५,००० पर्यंत आली. सहकारी संस्थांच्या मालकीच्या खेळत्या भांडवलांतहि वाढ झालेली आहे. अहवालाच्या मागील सालीं खेळतें भांडवल ६२ कोटी रुपयांचें होतें. तें आतां ६४·७२ कोटी रुपये झालें आहे. सभासदांची संख्या २६·२२ लाख होती. ती २६·६२ लाख झाली आहे. शेतीच्या सहकारी पतपेढ्यांच्या संख्येंतहि वाढ झालेली आहे. त्यांची संख्या १०,२९५ वरून १०,४८९ पर्यंत आली आहे. पतपेढ्यांच्या बाबतींत एक नवीन उपक्रम करण्यांत आलेला दिसून येतो. ग्रामीण भागांतील कांहीं निवडक ठिकाणीं २६ सहकारी बँका स्थापन करण्यांत आल्या. मध्यम मुदतीचीं कर्जें देण्यासाठीं त्यांची योजना करण्यांत

आलेली आहे. औद्योगिक उत्पादनाबाबतहि सहकारी तत्त्वाचा आश्रय करण्यांत येऊन १·२४ लाख हातमागांची संघटना करण्यांत आली. ह्या संघटनेनें ३·५६ कोटी रुपये किंमतीचें हातमागाचें कापड तयार केलें. इतर प्रकारच्या १६० ग्रामोद्योग सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. त्यांनीं काथ्याचा व कातड्याचा माल आणि भांडींकुंडीं तयार केलीं. ह्या सर्व मालाची किंमत सुमारें ५·७२ लाख रुपये झाली. समाजविकास योजना आणि राष्ट्रीय-विस्तार योजना ह्यांनीं व्यापलेल्या भागांतहि ३,६७९ सहकारी संस्था काम करीत होत्या. सहकारी घरबांधणी संस्थांनीं ४५६ नवीं घरें बांधलीं.

---

### औद्योगिक विकासांत जपानचें सहकार्य

भारतीय सरकारनें देशाचा औद्योगिक विकास साधण्यासाठी मिळेल तेथून मदत घेण्याचें धोरण स्वीकारलेलें आहे. औद्योगिक सहकार्य म्हटलें म्हणजे अजूनहि पुष्कळांची नजर पाश्चिमात्य राष्ट्रांकडेच वळते. पण अशा प्रकारची मदत जपानहि बऱ्याच मोठ्या प्रमाणावर देऊं शकेल. तज्ज्ञांचें असें मत आहे कीं जपानमधील सध्यांची उद्योगधंद्यांची पातळी गांठावयाची म्हटलें तरी भारताला २० वर्षांचा अवधी लागेल. शिवाय जपानी सरकार व उद्योगपती ह्यांची भारताकडे पाहण्याची दृष्टीहि बदललल्यासारखी दिसते. भारताला औद्योगिक मदत करणें म्हणजे आपण होऊनच प्रतिस्पर्धी निर्माण करणें होय अशी वृत्ति आतां दिसून येत नाहीं. जपानी सरकारनें पुरस्कृत केलेलें उद्योगपतींचें एक प्रतिनिधि मंडळ औद्योगिक सहकार्याबाबत भारतीय सरकारशीं वाटाघाटी करून गेले ही गोष्ट सूचक आहे. गेल्या कांहीं वर्षांत जपान व भारत ह्यांच्यांतील व्यापारांत फरक पडलेला आहे. अलीकडे जपानकडून यंत्रसामुग्री, विजेचीं भारी यंत्रें, रेल्वे एंजिनें इत्यादि, प्रकारचा अवजड माल भारत घेऊं लागला आहे. युद्धानंतर जपाननें आपल्या उद्योगधंद्यांची घडी त्वरित बसविली त्यामुळें नाना प्रकारच्या एंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांचा माल जपान आतां निर्यात करूं शकतो. भारताला आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी अशाच प्रकारच्या मालाची जरूरी आहे. भारताकडून जपानला कापूस, लोखंडाची व मँगेनीझची माती, तेल बिया आणि इतर कच्च्या मालाची आवश्यकता आहे. अशा रीतीनें उभयपक्षीं पूरक माल देण्याची पात्रता असल्यानें दोन्ही देशांमधील व्यापाराच्या वृद्धीस खूपच वाव आहे.

### अमेरिकेचें नवें विमानवाहक जहाज

सुएझच्या कालव्याचें इजिप्तच्या सरकारनें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर जगांतील मोठ्या राष्ट्रांचा अजूनहि लष्करी सामर्थ्यावर भरंवसा असल्याचें दिसून आलें. आधुनिक लष्करी साहित्य तयार करण्यास किती प्रचंड खर्च येतो तें अमेरिकेनें नुकत्याच बांधलेल्या 'रेंजर' ह्या विमानवाहक बोटीच्या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे. अमेरिकेनें भारताला नुकतीच १५ कोटी डॉलर्सची मदत केलेली आहे. ही मदत महत्त्वाची व भरीव तर खरीच. पण ह्या मदतीशीं अमेरिकेच्या संरक्षणावरील खर्चाची तुलना करतांना तंग राजकीय परिस्थितीचा अर्थकारणावर कसा प्रभाव पडतो तो लक्षांत येतो. 'रेंजर' ह्या विमानवाहू बोटीसाठीं अमेरिकेच्या सरकारनें २० कोटी डॉलर्स खर्च केले आहेत. अशाच प्रकारच्या आणखी तीन बोटी बांधण्यांत येणार आहेत. त्या बांधून झाल्यावर अमेरिकेच्या नाविक दलांत ६ प्रचंड विमानवाहक बोटी होतील. असें असून सुद्धां नाविक दलाच्या प्रमुखांचें समाधान नाहींच. त्यांना आणखी ६ बोटी हव्या आहेत. 'रेंजर' ही बोट 'क्वीन एलिझाबेथ' ह्या उतारू नेणाऱ्या ७८,००० टनी बोटीपेक्षा थोडी अधिकच लांब आहे. बोटीवर १०० विमानें ठेवण्याची सोय असून त्यांच्या उड्डाणासाठीं २५० फूट रुंदीचें डेक तयार केलेलें आहे. अमेरिकेच्या हवाई खात्याचा अशा बोटींना विरोध आहे. कांहीं थोड्या वर्षांनीं ह्या बोटी मोडींतच टाकाव्या लागतात असा अनुभव आहे. पण कर भरणारा अमेरिकन नागरिक अद्याप पुरेसा जागा झालेला नाहीं. कम्युनिझमच्या भयानें तो मुकाटपणें कर देत आहे. युद्धसाहित्यावर इतका खर्च करण्यापेक्षा अविकसित राष्ट्रांना मदत करावी अशी मागणी तो इतक्यातच करील असें वाटत नाहीं.




सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना १९१८

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

राष्ट्राकरितां बचत करा.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल रु. | १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल रु. | ७,५८,४०० |
| रिझर्व ..........रु. | ६,९७,००० |
| ठेवी ..........रु. | १,५१,००,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

भांडवल

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| गंगाजळी वगैरे | रु. | ८,७५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७,००,००,००० |

☆

—स्पेशल सेव्हिंग्ज योजना—

★ स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिटची योजना चालू आहे. व्याजाचा दर दोन टक्के.

★ रु. दहा हजारावरील रकमा तीन महिने व अधिक मुदतीसाठीं आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

☆

नवीन शाखा

बँकेच्या शाखा मराठवाड्यांतील जालना येथें व वऱ्हाडांतील अकोला येथें नुकत्याच सुरू झाल्या आहेत.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

वि. गि. जोग
मॅनेजर

# पुढें पाऊल

लेखक :—श्रीपाद वामन काळे, संपादक—'अर्थ' साप्ताहिक, पुणें. मूल्य दोन रुपये.

'कण आणि क्षण' या पुस्तकानें श्री. काळे यांना एवढी लोकमान्यता नि एवढी आंतरप्रांतीय प्रसिद्धि मिळवून दिली आहे की, तिची बरोबरी महाराष्ट्रांतील अव्वल दर्जाच्या आजी वा माजी कादंबरीकारालाहि आपल्या पहिल्या वहिल्या कथेनें आजपावेतों करतां आलेली नाहीं. अशा भाग्यवान व यशस्वी लेखकाचें 'पुढें पाऊल' हें दुसरें पुस्तक आहे. किर्लोस्कर, केसरी, सह्याद्रि, उद्यम, ज्ञानेश्वर आणि स्त्री या नियतकालिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या, प्रचलित सामाजिक नि कौटुंबिक जीवनांतील जिव्हाळ्याच्या प्रश्नांची चर्चा करून योग्य मार्गदर्शनाचा प्रयत्न करणाऱ्या एकूण सोळा निबंधांचा संग्रह या १३१ पृष्ठांच्या पुस्तकांत केलेला आहे. लेखकानें आपल्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें या पुस्तकांत 'कण आणि क्षण' यांतील प्रश्नाहून अधिक व्यापक समस्यांचा विचार करण्यांत आला आहे. उदाहरणार्थ, 'समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी' या पहिल्याच लेखांत आपल्या समाजांतील सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांतहि क्षुल्लक सोयीसाठीं वा क्षुद्र फायद्यासाठीं वाममार्ग नि भ्रष्टाचार यांची आवड किती मोठ्या प्रमाणांत दिसून येते तें दाखवून, त्याचा दुष्परिणाम सामाजिक व राष्ट्रीय ऱ्हासांत कसा होतो हें सूचित केलें आहे. आजकालचा अत्यंत चर्चेचा विषय होऊन राहिलेला एक महत्त्वाचा प्रश्न 'कॉलेजांतील मुली आणि त्यांचे आईबाप' या लेखांत फार चांगल्या प्रकारें मांडून श्री. काळे यांनीं मुलींच्या आईबापांना मार्गदर्शन केलें आहे. हा लेख प्रत्येक विद्यार्थिनीनें व तिच्या पालकांनीं विशेष मनन करण्यासारखा आहे. 'पाहुण्यांनो, यजमानाचा चष्मा लावा!' हा लेख व 'प्रत्येक शब्दाला अर्थ असतो' हा सर्वांनीं एकदा तरी नजरेखालीं घालावा. सुखी संसाराची गुरुकिल्ली म्हणजे 'संसारांतील सारंगी' हा निबंध होय. शेवटचे तीन लेख फक्त पुण्यामुंबईसारख्या मोठ्या पुढारलेल्या शहरांतील सुखवस्तु स्त्री-पुरुषांसाठींच आहेत असें वाटतें. एकंदरींत 'पुढें पाऊल' हें पुस्तकहि सांस्कृतिक शिक्षणाचें पाठ्यपुस्तक म्हणून सर्वत्र मान्यता पावेल अशी अपेक्षा आहे.

१२-१०-५६ —गर्जना

---

**आंध्र सरकारला कर्ज**—आंध्र राज्यांतील विकास योजना पुऱ्या करण्यासाठीं भारतीय सरकार ७ कोटी रुपयांचीं कर्जे देईल. तुंगभद्रा व मुचकुंद येथील वीज निर्माण करणाऱ्या धरणांच्या कामासाठीं आणि नवीन कालवे खणण्यासाठीं ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**करमणूक कराचें उत्पन्न**—१ एप्रिल ते २८ सप्टेंबर ह्या काळांत बृहन् मुंबईत करमणुकीवरील कराच्या रूपानें ४२ लाख रुपयांच्यावर रक्कम गोळा करण्यांत आली. त्या रकमेंत रेसेसला जाणाऱ्यांच्याकडून घेण्यांत आलेल्या कराचाहि समावेश आहे.

## "अर्था"चा दिवाळी अंक

**"अर्था"चा दिवाळीचा मोठा अंक नेहमीप्रमाणें दिवाळीमध्यें प्रसिद्ध होईल.**

**ज्या जाहिरातदारांनीं आपल्या जाहिराती अद्याप पाठविल्या नसतील, त्यांनीं त्या त्वरेनें पाठवाव्यात.**

*नेहमीप्रमाणें, दिवाळीपूर्वीचा म्हणजे २४ ऑक्टोबर, १९५६ चा अंक बंद राहील, ह्याची कृपेनें नोंद घ्यावी.*


## ✱ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ✱

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५

खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

उपाध्यक्ष श्री. वा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, ( बी. ए., (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी. ) मॅनेजर

# दि सांगली बँक लि.
## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.



# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—:व्याजाचे दरः—

चालू ठेव—अर्धा टक्का. सेव्हिंग्ज—दोन टक्के.
२ महिन्यांच्यापुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

☆ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

### श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें अध्यक्षीय भाषण

गेलें वर्ष, जगांतील प्रमुख राष्ट्रांत त्याचप्रमाणें आपल्या राष्ट्रांतहि आर्थिक क्षेत्रांत झालेल्या सर्वांगीण प्रगतिमुळें वैशिष्ट्यपूर्ण होतें. प्रगतीबरोबरच चलनवाढीचीं पावलें उमटलीं गेलीं आणि ह्या चलनवाढीचें चक्र काबूंत ठेवण्याचें बिकट कार्य जगांतील मध्यवर्ती बँकिंग संस्थांवर पडलें. त्यासाठी बँक रेटमध्यें वाढ करणें व ओपन मार्केट ऑपरेशन्स ह्या पुराण्या आर्थिक उपायांचा त्यांनीं अवलंब केला. इंग्लंडमध्यें बँकरेट वेळोवेळीं वाढवून आतां तर तो ५½ टक्के इतक्या उंच पातळीवर नेण्यांत आला आहे. आपल्या राष्ट्रानें इंग्लंडचें अनुकरण केलें नाहीं. परंतु तेथील बँकरेट वाढीचे परिणाम आपल्याकडील बँकिंग पद्धतीवर कमालीचे जाणवत आहेत. परराष्ट्रीय एक्स्चेंज बँकांना कॉल व अल्प-मुदतीच्या ठेवींवर ३½ ते ४ टक्के दर देणें फायदेशीर पडतें. ह्यामुळें सर्वच बँकांच्या खर्चाची चौकट विस्कटून गेली आहे. आतां तर ठेवी आकर्षून घेण्यासाठी अवास्तव दर देऊं करण्याची आत्यंतिक शर्यत चालू आहे. मोठमोठ्या बँकासुद्धां ह्या शर्यतींत सामील झालेल्या दिसतात. ह्या अनिष्ट प्रवृत्तींना सरकारनें पायबंद घालण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे.

### पहिली व दुसरी पंचवार्षिक योजना

पहिली पंचवार्षिक योजना नुकतीच पार पडली. तिच्यांत निश्चित केलेलीं उद्दिष्टें बहुतांशीं साध्य झालीं आहेत. १९५१-५६ ह्या काळांत चलन-फुगवटा १५ टक्क्यांनीं वाढला. घाऊक किंमतींचा निर्देशांक १३ टक्क्यांनीं खाली आला असून राष्ट्रीय उत्पन्न (स्थिर किंमतीप्रमाणें) १८ टक्क्यांनीं वाढलें आहे. व्यापारी बँकिंग पद्धतींतील साधनसंपत्तींत १६ टक्के वाढ झालेली दिसून आली. तदनुषंगानें आपल्या बँकेच्या खेळत्या भांडवलांत झालेली ४४ टक्क्यांची वाढ पाहून खरोखरच आनंद वाटतो. ह्याच समाधानी वृत्तीनें आपण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पदार्पण करीत आहोंत. ही योजना पहिल्या योजनेपेक्षा अधिक महत्त्वकांक्षी आहे. योजनेचा व्याप रु. ७,२०० कोटी येवढा मोठा आहे. पैकीं रु. ४,८०० कोटी सरकार नियंत्रित सार्वजनिक विभागांतून (Public Sector) व रु. २,४०० खाजगी विभागांतून उभारले जातील. योजनेला लागणाऱ्या खर्चापैकीं बराचसा मोठा भाग, रु. ३,६०० कोटी, प्रामुख्यानें चालू मुलकी उत्पन्नांतील शिल्लक, कर्जें, सरकार नियंत्रित संस्था (उदाहरणार्थ रेल्वे, प्राव्हिडंट फंड) इत्यादि मार्गानें मिळेल. उरलेल्या रु. १,२०० कोटींची भर तुटीच्या अर्थकारणांतून केली जाईल. तुटीच्या अर्थकारणाचें नवें तंत्र अत्यंत काळजीपूर्वक व समंजसपणें हाताळलें जावयास पाहिजे. नाहींतर त्यामुळें चलनविस्तारास वाव मिळेल. त्या दिशेनें सरकारास आपलीं करविषयक धोरणें आंखतांना तीं लवचिक ठेवावीं लागतील. कारण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील प्रगतीचा परमोच्च बिंदु गांठतांना त्या गतिमानतेबरोबरच निर्माण होणाऱ्या चलनविस्ताराच्या प्रवृत्तींना कह्यांत ठेवावें लागेल. उत्पादनाच्या प्रमाणांत जनतेची क्रयशक्ति राहील अशी व्यवस्था करणें हा ह्या प्रश्नाचा मर्मबिंदु होय. करविषयक धोरणेंहि कर-चौकशीसमितीच्या शिफारसींनुसार निश्चितपणें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर वसूल करण्याच्या दृष्टीनें ठरविण्यांत येतील. आर्थिक धोरणाबाबत लोकसभेनें आर्धीच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टमध्यें दुरुस्ती करून बँक-क्रेडिटमध्यें गैर वाढ होऊं नये म्हणून बँकिंग पद्धतींतील रोकड अनामत प्रमाण (Cash Ratio) नियंत्रित करणें अगर बदलणें ह्यासंबंधीचे अधिकार रिझर्व्ह बँकेस दिले आहेत.

छोट्या व ग्रामिण उद्योगधंद्यांस दिलेलें महत्त्वाचें स्थान व त्यायोगें राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी महान व वर्धिष्णु अशा सहकारी विभागाची करावयाची उभारणी यांमध्यें सहकारी क्षेत्रांतील कार्यकर्त्यांस भरपूर संधि मिळेल. उद्योगधंद्यांचा विकेंद्रित विभाग उभारण्याच्या कार्यांत नागरी बँकांना निर्णायक भूमिका पार पाडावयाची आहे.

### सरकारचें धोरण

ही योजना अंमलांत आणण्याची पूर्वतयारी म्हणून सरकारनें आपलें औद्योगिक धोरण जाहीर करून फार चांगली गोष्ट केली आहे. कारण त्यामुळें सरकार-नियंत्रित सार्वजनिक व खाजगी विभाग यांनीं पार पाडावयाच्या कामगिरीचें अधिक स्पष्टीकरण झालें आहे. सरकार नियंत्रित सार्वजनिक विभागास जें प्रमुख स्थान देण्यांत आलें आहे, त्यावर खासगी विभागाच्या हितसंबंधियांनीं जोरदार हल्ला चढविला असून नुकत्याच झालेल्या आयुर्विमा धंद्याच्या राष्ट्रीयकरणास त्यांनीं निव्वळ आर्थिक हुकूमशाहि असें नामाभिधान दिलें आहे. त्या वेळचे अर्थ-मंत्री श्री. चिं. द्वा. देशमुखांनीं ह्या मार्गाच्या अवलंबाचें समर्थन करतांना हा मार्ग संसदेनें मान्य केलेल्या समाजवादी समाजरचनेच्या धोरणानुसारच अंगिकारण्यांत आला आहे असें सांगितलें. राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, "ह्यायोगें एका बाजूस जनतेंत काटकसरीच्या संवयींस उत्तेजन देऊन आपत्तीच्या काळासाठी तरतूद करावयास मिळेल, तर दुसऱ्या बाजूनें राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या व सरकारपाशीं असलेल्या भांडवलांत त्यायोगें भर पडेल."

### "बचत करा; पैसा शिलकींत टाका"

योजनेंत अंदाज केल्याप्रमाणें बचतीच्या रूपानें रु. ५०० कोटी उभे केले जातील. बचत करून योजनेच्या यशासाठी हातभार लागणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य ठरतें. आपल्या बँकेनें बचतीसाठी होम सेव्हिंग सेफ, राष्ट्रीय बचत-योजना, रिकरिंग ठेवी, खास बचत व रौप्यमहोत्सव बचत यांसारख्या निरनिराळ्या आकर्षक योजना आंखल्या आहेत. ह्या योजना प्रत्येकास परवडतील अशाच आहेत. बँकेंत जवळ जवळ १७,५०० खातीं आहेत. जर प्रत्येक ठेवीदारानें दर महिन्यास सरासरी रु. ५ ची बचत केली तर प्रतिवर्षी रु. १०,००,००० ची बचत होऊन पांच वर्षांत ती रु. ५०,००,००० होईल. राष्ट्राची आर्थिक घडी बळकट करणें व जनतेची परिस्थिति सुधारणें ह्यासाठी चाललेल्या राष्ट्राच्या प्रयत्नांत बँकेला ह्या रु. ५० लाखांच्या ठेवीमुळें आपला वाटा उचलतां येईल. त्यासाठी माझी आपणांस येवढीच विनंति आहे कीं, खर्चांत बचत करा व पैसा शिलकींत टाका. राष्ट्राच्या दृढ आणि वेगवान प्रगतीसाठी त्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

---

**तेलाची वहातूक नळानें करणार?**—सुएझचा कालवा बंद झाला तर अडचण होऊं नये म्हणून मध्यपूर्वेंतील खाणींत उत्पन्न करण्यांत येणारें तेल नळांच्या साह्यानें भूमध्यसमुद्राच्या कांठावर आणण्याची योजना फ्रान्सनें तयार केली आहे. बोटींनीं वहातूक करण्यापेक्षा ह्या रीतीनें निम्मा अगर दोनतृतिआंश खर्च येईल, असें सांगण्यांत येत आहे.

## सातारा जिल्हा को. लँडमॉर्गेज बँक लि.

वरील प्रगतिप्रिय बँकेनें ३०–६–५६ अखेर संपलेल्या वर्षी १४७ अर्जदारांना २,८४,९५० रु. चें कर्ज वांटप केलें. बँकेच्या स्थापनेपासून आजवर बँकेनें १३१२ अर्जदारांना २२,०२,२०० रु. कर्ज दिलें आहे. बँकेच्या कर्जाची पूर्ण फेड अहवाल सालांत २० सभासदांनीं १३,२५४ रु. देऊन केली, ही समाधानाची गोष्ट आहे. बँकेनें अहवालाचे वर्षींहि १,५३,६०७ रु. चा वरिष्ठ बँकेचा हप्ता भरला आहे. हप्ता मुदतींत भरण्यास गेल्या २१ वर्षांत, म्हणजे बँकेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत, ह्या बँकेकडून टाळाटाळ झालेली नाहीं. इतर लँड मॉर्गेज बँकांशीं तुलना केली असतां ह्या गोष्टीचें वैशिष्ट्य सहज पटेल. बँकेस अहवालाच्या वर्षी १६,४२४ रु. नफा झाला. बँकेच्या खर्चाचें प्रमाण एकसारखें उतरत चाललें आहे, हीहि गोष्ट चालकांना अभिमानास्पद आहे. भागदारांना ३½% डिव्हिडंड देण्यांत आलें.

लँड मॉर्गेज बँकांच्या कामांत कूळकायद्यासारखे कायदे व सरकारच्या सहानुभूतीचा अभाव इत्यादींमुळें व्यत्यय येत असतांनाहि ह्या बँकेचें काम व्यवस्थित चालू आहे. ( चेअरमन: नीलकंठराव आण्णाप्पा कुलकर्णी. मॅनेजर: एम्. एस्. पुटाणी ).

**बेळगांव जिल्ह्यांत साखरेचा कारखाना**— बेळगांव जिल्ह्यांत संकेश्वर ह्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर चालणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी एकूण ७० लाखांचें भांडवल लागेल. त्यापैकी १५ लाख रुपये उसाचे शेतकरी जमविणार आहेत. १० लाख रुपयांचे भाग मुंबई सरकार घेईल व ४५ लाख रुपये इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून कर्जाऊ मिळतील.

**अमेरिकेंतील निवडणुका**— अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक ६ नोव्हेंबरला होणार आहे. ह्या निवडणुकीबाबत चाललेला प्रचार आणि मतदान ह्यांचें निरीक्षण करण्यासाठीं रशिआनें आपले प्रतिनिधी पाठवावे अशी सूचना अमेरिकेतर्फे करण्यांत आली होती. रशिआनें सूचनेचा स्वीकार केला असून सुप्रीम सोव्हिएटच्या निवडणुका पहाण्यासाठीं अमेरिकन निरीक्षकांना आमंत्रण दिलें आहे.

**रेल्वेचें नवें वर्कशॉप**—पश्चिम रेल्वेनें साबरमती येथें नवें वर्कशॉप उघडण्याचें ठरविलें आहे. वर्कशॉपसाठी २५ लाख रुपये खर्च येईल. साबरमती हें ठिकाण सोयीच्या दृष्टीनें पश्चिम रेल्वेला मध्यवर्ती आहे. वर्कशॉपसाठी ६,००० चौरस फूट जागा लागेल. रुंद व अरुंद रुळांच्या रेल्वेगाड्यांचे फलाट तेथें बांधण्यांत येतील.

**कोळशाच्या खाणींचें नुकसान**— असनसोलच्या आसमंतांत नुकताच जो पूर आला त्यामुळें राणीगंज विभागांतील कोळशाच्या खाणींचे बरेंच नुकसान झालें आहे. पुरामुळें दरमहा फक्त १२,००० टन कोळसा निघेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या विभागांतील खाणींतून भारताच्या एकूण उत्पादनापैकी एकतृतिआंश कोळशाचें उत्पादन होतें.

**बांबूंपासून अधिक कागद**— डेहराडून येथील जंगलविषयक संशोधनसंस्थेनें बांबूंचा उपयोग करून पूर्वीपेक्षा अधिक कागद तयार करण्याची रीत शोधून काढली आहे. ह्या नव्या पद्धतीमुळें १८० टन बांबूंचा उपयोग करून ६७ ते ७० टन हलक्या प्रतीचा कागद तयार होईल.


**... आणि ...**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक: —श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

स्थापना सन १९३५ टे. नं. २४५१८

**दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १


( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,००० हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

☆ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ☆

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. वेंडे, श्री. ज्ञा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.





हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्र...